**ग्रामीण कृषी मौसम सेवा**
भारत मौसम विभाग
प्रायोगिक ब्लॉक लेव्हल अॅग्रोमेट अॅडव्हायझरी बुलेटिन
(आयएमडी आणि आयसीएआर चा संयुक्त उपक्रम)

# हवामानावर आधारीत कृषि सल्ला

**दिनांक : 11-07-2025**

**नागपूर(महाराष्ट्र) मध्ये रामटेक ब्लॉक करा साठी हवामान पूर्वानुमान - वर जारी :2025-07-11 ( पुढील पाच दिवसांसाठी सकाळी ८:३० वाजेपर्यंत वैध)**

| हवामान घटक | 2025-07-12 | 2025-07-13 | 2025-07-14 | 2025-07-15 | 2025-07-16 |
|---|---|---|---|---|---|
| पर्जन्यमान (मिमी) | 11.6 | 8.5 | 11.8 | 7.4 | 3.8 |
| कमाल तापमान (अं.से) | 30.2 | 28.7 | 28.4 | 29.4 | 31.2 |
| किमान तापमान (अं.से) | 24.4 | 24.6 | 24.2 | 23.8 | 24.4 |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 90.8 | 91.1 | 90.9 | 92.9 | 90.6 |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 69 | 80.1 | 75.8 | 71.7 | 63.8 |
| वाऱ्याचा वेग(किमी/तास) | 11.2 | 12.2 | 10 | 8.6 | 5.9 |
| वाऱ्याची दिशा(अंश) | 284.9 | 283.6 | 282.5 | 360 | 259.4 |
| मेघाच्छादन (ऑक्टा) | 7 | 8 | 8 | 8 | 8 |

## हवामान सारांश / चेतावणी:

`• भारतीय हवामान विभाग, प्रादेशिक हवामान केंद्र, नागपूर च्या अंदाजानुसार, पुढील पाच दिवस दिनांक १२ ते १६ जुलै २०२५ दरम्यान आकाश आंशिक ते मुख्यतः ढगाळ राहण्याची शक्यता, • दिनांक १२, १३ व १४ जुलै २०२५ रोजी हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस होण्याची शक्यता, • दिनांक १५ व १६ जुलै २०२५ रोजी हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस होण्याची शक्यता, • पुढील तासामध्ये विदर्भामध्ये कमाल तापमानात २ ते ३ अंश सेल्सिअस ने वाढ होईल त्यानंतर फारसा बदल होणार नाही. • विस्तारित स्वरूपाच्या अंदाज प्रणालीनुसार विदर्भामध्ये दिनांक १६ जुलै ते २२ जुलै २०२४ दरम्यान सरासरी एवढा पाऊस होण्याची शक्यता तर कमाल व किमान तापमान सरासरी एवढे राहण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

## कृषि सल्ला:

• मागील आठवड्यामध्ये झालेल्या पावसामुळे पिक क्षेत्रामध्ये साचलेल्या अतिरिक्त पाण्याचा तात्काळ निचरा करावा. • स्थानिक स्वच्छ व शांत हवामान परिस्थितीचा अंदाज घेऊन वाफसा अवस्थेत कृषी रसायनांच्या फवारणीची कामे, उभ्या पिकात खते देण्याची कामे तसेच आंतरमशागतीची (खुरपणी/डवरणी इत्यादी.) कामे सुरु करावी.. • ज्या ठिकाणी कपाशी, सोयाबीन तूर अशा इत्यादी पिकाची पेरणी झाली आहे अशा ठिकाणी वाफसा आल्यानंतर ज्या ठिकाणी खांडे पडले असतील त्या ठिकाणी बियाणे पेरून खांडे भरून घ्यावेत. • तण व्यवस्थापनासाठी उगवण पश्चात तणनाशकांचा वापर हा जमिनीमध्ये पुरेसा ओलावा असताना आणि शांत आणि स्वच्छ हवामान परिस्थिती असतांना करावा. विभिन्न तणनाशके एकमेकांमध्ये मिसळू नये, विभिन्न सक्रीय घटकांचा तण व्यवस्थापनासाठी सुरक्षित आणि कार्यक्षम तण व्यवस्थापनासाठी फक्त पूर्व-मिश्रित तणनाशकांचा वापर करावा. • मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याचा अंदाज वर्तविलेल्या दिवशी गाय, म्हैस, शेळ्या, मेंढ्या व इतर पाळीव

जनावरे मोकळ्या जागेत चरावयास सोडण्याचे टाळावे. जनावरे हे खुल्या पाण्याचे स्त्रोत, नदी किंवा तलाव व ट्रॅक्टर व इतर धातूच्या अवजारांपासून दूर ठेवावे. जनावरांना गोठ्यामध्ये पुरेश्या चारा व पाण्याची व्यवस्था करावी. शेतकरी व शेतमजूर बांधवांनी विजांचा कडकडाट होण्याचा अंदाज लक्षात घेता स्वतः ची तसेच पशुधनाची काळजी घ्यावी. झाडाखाली आश्रय घेणे कटाक्षाने टाळावे तसेच पशुधनाचा सुद्धा झाडाखाली आश्रय टाळावा. • कपाशीतील रोप अवस्थेतील मुळकुज रोग व्यवस्थापन: मुळकुज रोगग्रस्त रोपे ठिकठिकाणी आढळून येऊ शकतात. सुरुवातीच्या लक्षणांनुसार रोपांना १ किलो ट्रायकोडर्मा व्हिरिडी अथवा ट्रायकोडर्मा हर्झियानम विरघळणारी पावडर किंवा द्रवरूप स्वरूपातील चांगल्या कुजलेल्या ५० किलो शेणखत किंवा कंपोस्टमध्ये मिसळून १ एकर क्षेत्रात जमिनीत मिसळावे. किंवा कार्बेन्डाझिम ५० डब्ल्यूपी @ १२ ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून रोगग्रस्त ठिकाणी आळवणी (स्पॉट ड्रेंचींग) करावी, आळवणी करण्यासाठी तयार केलेल्या द्रावणाचे प्रमाण आळवणी करण्यासाठी मुळ्या ओल्या होतील एवढेच वापरावे.

## संक्षिप्त संदेश सल्ला:

• पिक क्षेत्रामध्ये साचलेल्या अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा.

## पिक निहाय सल्ला:

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| कपाशी | • कपाशीतील रोप अवस्थेतील मुळकुज रोग व्यवस्थापन: मुळकुज रोगग्रस्त रोपे ठिकठिकाणी आढळून येऊ शकतात. सुरुवातीच्या लक्षणांनुसार रोपांना १ किलो ट्रायकोडर्मा व्हिरिडी अथवा ट्रायकोडर्मा हर्झियानम विरघळणारी पावडर किंवा द्रवरूप स्वरूपातील चांगल्या कुजलेल्या ५० किलो शेणखत किंवा कंपोस्टमध्ये मिसळून १ एकर क्षेत्रात जमिनीत मिसळावे. किंवा कार्बेन्डाझिम ५० डब्ल्यूपी @ १२ ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून रोगग्रस्त ठिकाणी आळवणी (स्पॉट ड्रेंचींग) करावी, आळवणी करण्यासाठी तयार केलेल्या द्रावणाचे प्रमाण आळवणी करण्यासाठी मुळ्या ओल्या होतील एवढेच वापरावे. • डवरणी आणि खुरपनीची कामे शक्यतो सकाळच्या वेळी करावी. प्रभावी तन व्यवस्थापनासाठी तन २ ते ३ पानावर असताना तन नाशकाचा वापर करावा. • पिक उगवणीनंतर तन व्यवस्थापनासाठी, रुंद पानाच्या तन नियंत्रणासाठी पायरिथिओबॅक सोडियम १० % ईसी १२.५ मिली ते १५ मिली प्रती १० लिटर पाणी किंवा गवतवर्गीय प्रकारच्या तन नियंत्रणासाठी क्विझालोफॉप इथाइल ५ % ईसी १५ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून जमिनीमध्ये पुरेसा ओलावा असताना फवारणी करावी. • पिक उगवणीनंतर रुंद व अरुंद पानाच्या तन व्यवस्थापनासाठी पायरिथिओबॅक सोडियम ६ % ईसी + क्विझालोफॉप इथाइल ४ % ईसी २० ते २५ मिली प्रती १० लिटर पाणी या प्रमाणात स्थानिक स्वच्छ हवामान परिस्थिती असताना फवारणी करावी. |
| सोयाबीन | `• ज्या ठिकाणी सोयाबीन पेरणी झाली आहे अशा ठिकाणी वाफसा आल्यानंतर ज्या ठिकाणी खांडे पडले असतील त्या ठिकाणी बियाणे पेरून खांडे भरून घ्यावेत. • उशिरा सोयाबीन पेरणी करणाऱ्या शेतकरी बांधवांनी कमी कालावधीच्या जेएस-२०-३४, एनआरसी १३०, एनआरसी १३१, एनआरसी १३८ या सारख्या सोयाबीन वाणांच्या लागवडीस प्राधान्य द्यावे. • सोयाबीन पिकामध्ये तणनाशकांच्या फवारणीसाठी पॉवर स्प्रेअर द्वारे फवारणी करत असल्यास १२५ लिटर पाणी प्रती हेक्टर तर नॅपसॅक स्प्रेअर द्वारे फवारणी करत असल्यास ४५० लिटर पाणी प्रती हेक्टर या प्रमाणात पुरेसे पाणी वापरावे. • तणनाशके वापरताना फ्लड जेट/फ्लॅट फॅन नोजल वापरण्याची शिफारस केली जाते. • सोयाबीन पिकासाठी शिफारशीतील उगवण पश्चात तणनाशक (पेरणीनंतर १५ -२० दिवसांनी) असलेले तणनाशक: सोयाबीन पिकामध्ये उगवण पश्चात तणांचे व्यवस्थापन खालीलपैकी कोणतेही एक तणनाशक तणांचा प्रकार लक्षात घेऊन जमिनीत पुरेसा ओलावा सूर्यप्रकाश असतानाच वापरावे. • लेबल क्लेम शिफारस काळजीपूर्वक वाचून घ्यावी तसेच त्यातील सूचनांचे काळजीपूर्वक पालन करावे. • इमाझीथापर १० एस एल @ १.०० लिटर प्रति हेक्टर प्रति ५०० ते ६०० लिटर पाणी. किंवा इमाझीथापर ७० % डब्ल्यूजी + सर्फॅक्टंट @ १०० ग्रॅम प्रति हेक्टर प्रति ५०० लिटर पाणी किंवा क्विझालोफॉप-इथिल ५ ईसी @ ०.७५ ते १.०० लिटर प्रति हेक्टर प्रति ५०० ते ६०० लिटर पाणी. किंवा क्विझालोफॉप-पी-इथिल १० ईसी @ ३७५ ते ४५० मिली लिटर प्रति हेक्टर प्रति ३०० ते ५०० लिटर पाणी किंवा फेनोक्साप्रॉप-पी- इथाइल ९.३ ईसी @ १.११ लीटर प्रति हेक्टर प्रति |

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| | २५० ते ३०० लिटर पाणी. किंवा क्विझालोफॉप -पी-टेफ्युरिल ४.४१ ईसी @ ०.७५ ते १.०० लिटर प्रति हेक्टर प्रति ४०० लिटर पाणी किंवा फ्लुअझीफॉप-पी-ब्यूटाइल १३.४ ईसी @ १ ते २ लिटर प्रति हेक्टर प्रति ५०० लिटर पाणी किंवा हॅलॉक्सीफॉप आर मिथाइल १०.५ ईसी @ १ ते १.२५ लिटर प्रति हेक्टर प्रति ५०० लिटर पाणी किंवा प्रोपॅक्विझाफॉप १० ईसी @ ०.५ ते ०.७५ लिटर प्रति हेक्टर प्रति ५०० ते ७५० लिटर पाणी किंवा फ्लुथियासेट मिथाइल १०.३ ईसी @ १२५ मिली प्रति हेक्टर प्रति ५०० लिटर पाणी किंवा क्लेथोडीम २५ ईसी @ ०.५ ते ०.७५ लिटर प्रति हेक्टर प्रति ५०० ते ७५० लिटर पाणी. • सोयाबीन पिकासाठी शिफारशीतील उगवण पश्चात पूर्व मिश्रित (पेरणीनंतर १५ -२० दिवसांनी) असलेले तणनाशक: सोयाबीन पिकामध्ये पूर्व मिश्रित तन नाशकाद्वारे उगवण पश्चात तणांचे व्यवस्थापन खालीलपैकी कोणतेही एक तणनाशक तणांचा प्रकार लक्षात घेऊन जमिनीत पुरेसा ओलावा सूर्यप्रकाश असतानाच वापरावे. • लेबल क्लेम शिफारस काळजीपूर्वक वाचून घ्यावी तसेच त्यातील सूचनांचे काळजीपूर्वक पालन करावे. • फ्लुअझीफॉप-पी-ब्युटाइल + फोमेसाफेन एसएल @ १ लिटर प्रति हेक्टर प्रती ५०० लिटर पाणी. किंवा • इमाझीथापर ३५ + इमाझामॉक्स ३५ डब्ल्यूजी @ १०० ग्रॅम प्रति हेक्टर प्रती ३७५ ते ५०० लिटर पाणी. किंवा प्रोपॅक्विझाफॉप २.५ % + इमॅझेथापियर ३.७५ % एमई @ २.० लिटर प्रति हेक्टर प्रती 500 लिटर पाणी. किंवा सोडियम एसफ्लोरोफेन १६.५ + क्लोडिनाफॉप प्रोपार्गिल 18 ईसी @ १.० लिटर प्रति हेक्टर प्रती ५०० लिटर पाणी. किंवा फोमेसाफेन १२ + क्विझालॉफॉप इथाइल ३ % एससी @ १.५ लिटर प्रति हेक्टर प्रती ५०० लिटर पाणी. किंवा क्विझालोफॉप इथाइल १० % ईसी+ क्लोरीमुरॉन इथाइल २५ % डब्ल्यूपी + सर्फॅक्टंट (०.२ %) (हर्बिसाइड) (ट्विन पॅक) @ ३७५ मिली + ३६ ग्रॅम + ०.२ % प्रति हेक्टर प्रती ३०० लिटर पाणी. |
| तूर | • ज्या ठिकाणी तूर पेरणी झाली आहे अशा ठिकाणी वाफसा आल्यानंतर ज्या ठिकाणी खांडे पडले असतील त्या ठिकाणी बियाणे पेरून खांडे भरून घ्यावेत. |

## फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला:

| फळे आणि भाजीपाला पिक | फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला |
|---|---|
| संत्रा | • कोळी कीड नियंत्रणासाठी उपाययोजना: • जर २% फळे व १० % पाने कोळीमुळे प्रभावित दिसत असतील, तर ही "आर्थिक नुकसानीची पातळी" समजली जाते आणि या स्थितीत त्वरित नियंत्रणात्मक उपाययोजना राबवणे आवश्यक ठरते. • १. सेंद्रिय उपाय: अझेंडीरॅक्टीन (१%) २ मि.ली. किंवा नीम तेल १० मि.ली. प्रती लिटर पाण्यामध्ये मिसळून फळधारणेच्या वेळी फवारणी केल्यास ही कीड नियंत्रणात ठेवता येते. १५ दिवसांच्या अंतराने पेट्रोलियम स्प्रे ऑईल (हॉर्टीकल्चर मिनरल ऑईल) (२%) २० मि.ली. प्रति लिटर पाणी या प्रमाणात घेऊन दोनदा फवारणी करावी, • २. रासायनिक उपाय: कोळीचा प्रादुर्भाव दिसताच स्पायरोटेट्रामेंट (१५.३१% ओडी) ०.६ मि.ली. किंवा डायफेनथीयुरॉन (५० डब्लुपी) २ ग्रॅम प्रती लिटर पाण्यामध्ये मिसळुन फळधारणेच्या वेळी १५ दिवसांच्या अंतराने फवारणी केल्यास ही कीड नियंत्रणात ठेवता येते. • पाने खाणारी अळी (लेमन बटरफ्लाय) या किडीचे व्यवस्थापन: रोपवाटीकेमध्ये व लहान बगीच्यात झाडांवरील अळीच्या विभिन्न अवस्था हाताने जमा करून नष्ट कराव्यात. बेसिलस थूरीनजीएनसीस (बीटी) २ ग्रॅम प्रती लिटर पाण्यामध्ये मिसळून अळीच्या सुरवातीच्या अवस्थेत १० दिवसाच्या अंतराने फवारणी करावी. • रासायनिक उपाय: अळीच्या नियंत्रणासाठी क्विनालफॉस (२५ ई.सी.) २.० मि.ली. प्रती लिटर पाण्यामध्ये मिसळून अळीच्या सुरवातीच्या अवस्थेत १० दिवसाच्या अंतराने फवारणी करावी. • जमिनीमध्ये पुरेसा ओलावा असल्याची खात्री आणि वाफसा आल्यानंतर भरून ठेवलेल्या खड्ड्यांमध्ये संत्र वर्गीय फळझाडांच्या कलमांची लागवड करावी. कलमा लावतांना कलमांचा डोळा १५ ते २० सेंमी उंचीवर असावा. कलमा लावण्यापूर्वी मुळांना मेफेनोक्झाम एम झेड-६८ २.५ ग्राम आणि कार्बेन्डाझीम ५० % डब्ल्यूपी १ ग्राम प्रती १ लिटर पाणी या प्रमाण द्रावण तयार करून बुडवून नंतर लावावीत. • झाडांच्या बुंध्याजवळ पाणी साचून राहणार नाही याची काळजी घ्यावी. झाडावरील पानसोट काढून टाकावेत. दोन ओळीमधील मोकळ्या जागेत उडीद, मुग, सोयाबीन, भुईमुग इत्यादी पिकाची आंतरपीक म्हणून लागवड करावी. हिरवळीच्या खताच्या उपलब्धतेसाठी धेंचा किंवा |

| फळे आणि भाजीपाला पिक | फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला |
|---|---|
| | ताग ४० किलो प्रती हेक्टर बियाणे या प्रमाणात पेरणी करावी. • नवीन नवतीवर सिट्रस सिला, मावा आणि नाग अळीचा प्रादुर्भाव सामान्यपणे दिसून येतो. या किडींच्या व्यवस्थापनासाठी डायमिथोएट# ३० ईसी @ २० मिली किंवा थायमेथोक्झाम# २५ डब्ल्यूजी @ ३.० ग्राम किंवा इमिडाक्लोप्रीड# १७.८ एसएल @ ५.० मिली तसेच कोळी किडीच्या व्यवस्थापनासाठी डायफेनथीयुरोन# ५० डब्ल्यूपी @ २० ग्राम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून नवतीच्या काळात स्वच्छ हवामान परिस्थिती असताना फवारणी करावी. आवश्यकता भासल्यास वरीलपैकी कोणत्याही किटक नाशकाची १५ दिवसाच्या अंतराने फवारणी करावी. |
| मिरची | • मिरची च्या ४ ते ६ आठवड्याच्या वयाच्या रोपांची लागवड वाफसा अवस्थेत करावी. • मिरचीच्या रोपांची लागवड करण्यापूर्वी रोपांचे शेंडे डायमेथोएट ३० ईसी १० मि. ली + पाण्यात मिसळणारे गंधक (८० %) ३ ग्रॅम + मॅन्कोझेब ७५ % डब्ल्यूपी २.५ ग्रॅम एक लिटर पाण्याच्या द्रावणात बुडवून लावावे. • रोप अवस्थेतील मुळकुज रोग व्यवस्थापन: मुळकुज रोगग्रस्त रोपे ठिकठिकाणी आढळून येऊ शकतात. सुरुवातीच्या लक्षणांनुसार रोपांना १ किलो ट्रायकोडर्मा व्हिरिडी अथवा ट्रायकोडर्मा हर्झियानम विरघळणारी पावडर किंवा द्रवरूप स्वरूपातील चांगल्या कुजलेल्या ५० किलो शेणखत किंवा कंपोस्टमध्ये मिसळून १ एकर क्षेत्रात जमिनीत मिसळावे. किंवा कार्बेन्डाझिम ५० डब्ल्यूपी @ १२ ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून रोगग्रस्त ठिकाणी आळवणी (स्पॉट ड्रेंचींग) करावी, आळवणी करण्यासाठी तयार केलेल्या द्रावणाचे प्रमाण आळवणी करण्यासाठी मुळ्या ओल्या होतील एवढेच वापरावे. |

## पशुधन विषयक निहाय सल्ला:

| पशुधन विषयक | पशुधन विषयक निहाय सल्ला |
|---|---|
| गाय | • पाऊस व विजांचा कडकडाट होण्याची शक्यता लक्षात घेता गाय, म्हैस, शेळ्या, मेंढ्या व इतर पाळीव जनावरे मोकळ्या जागेत चरावयास सोडण्याचे टाळावे. जनावरे हे खुल्या पाण्याचे स्त्रोत, नदी किंवा तलाव व ट्रक्टर व इतर धातूच्या अवजारांपासून दूर ठेवावे. • जनावरे पावसात फार काळ भिजणार नाहीत याची काळजी घ्यावी. • गोठयातील जमीन कोरडी ठेवावी व स्वच्छता राखावी. • बुरशी लागू नये यासाठी जनवारांचे खाद्य व चारा सुरक्षित साठवावा. • जनावरांच्या गोठयाचा सभोवतालील परिसर स्वच्छ व निरोगी ठेवावा आणि गोठ्याभोवती असलेली अनावश्यक झाडे झुडुपे काढून टाकावीत. • नवीन हिरवा चारा जास्त प्रमाणात खाण्यास जनावरांना प्रतिबंध करावा. |
| बकरा किंवा बकरी | • शेळ्यांना पायखुरी/तोंडखुरी, घटसर्प आणि आंत्रविषार टाळण्याकरिता पशुवैद्यकीय अधिकाऱ्याच्या सल्ल्याने लसीकरण करावे. जनावरांना स्वच्छ आणि थंड पाण्याची सोय करावी. |

## इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला:

| इतर (माती / जमीन तयार करणे) | इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला |
|---|---|
| सामान्य सल्ला | • तननाशकाची खरेदी आणि फवारणी करताना लेबल नीट वाचून घ्यावे. ढगाळ हवामान व पाऊस असताना तननाशकाची फवारणी करू नये. वारा नसताना व जमिनीत पुरेसा ओलावा असताना उगवण पूर्व तन नाशकाची फवारणी करावी. फवारणीकरिता स्वच्छ पाणी वापरावे तसेच कडक उन्हात उगवण पश्चात फवारणी टाळावी. तन नाशकाचा वापर काळजीपूर्वक करावा. फवारणी पूर्वी फवारणी |

| इतर (माती / जमीन तयार करणे) | इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला |
|---|---|
| | पंप स्वच्छ धुवून घ्यावा. ढगाळ हवामान असतांना फवारणी करू नये. शिफारशीत नसलेली भिन्न तननाशके एक मेकांत मिसळू नये. तननाशकाची फवारणी पूर्वी जमिनीमध्ये पुरेसा ओलावा असल्याची खात्री करावी. |